# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः18.01.2025** **वारःशनिवार**

1. संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या 31 जानेवारीपासून; 1 फेब्रुवारीला सादर होणार केंद्रीय अर्थसंकल्प
2. राष्ट्रीय क्रीडा आणि शौर्य पुरस्कार नवी दिल्लीत राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान
3. दावोसमध्ये होणाऱ्या जागतिक आर्थिक मंच परिषदेत मुख्यमंत्री सहभागी होणार
4. देशातील 63 सहकारी साखर कारखान्यांना मक्यापासून इथेनॉल बनवण्यासाठी तत्वतः मान्यता आणि
5. पुणे-नाशिक महामार्गावर भीषण अपघातात नऊ जणांचा मृत्यू

**<u>अर्थसंकल्पीय अधिवेशन</u>**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या 31 जानेवारीपासून सुरू होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू 31 जानेवारीला दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेला संबोधित करणार आहेत. त्यानंतर एक फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थसंकल्प सादर होईल. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा 31 जानेवारी ते 13 फेब्रुवारी दरम्यान आणि दुसरा टप्पा 10 मार्च ते 4 एप्रिल या कालावधीत होणार आहे.

**<u>क्रीडा पुरस्कार</u>**

राष्ट्रीय क्रीडा आणि शौर्य पुरस्कारांचं वितरण काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्लीत झालं. देशातला सर्वोच्च क्रीडा सन्मान असलेला मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार बुद्धिबळ जगज्जेता डी गुकेश, हॉकीपटू हरमनप्रीत सिंग, पॅरा ॲथलीट प्रवीण कुमार, आणि नेमबाज मनु भाकर या चौघांना प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ खेळाडू सुचा सिंग आणि दिव्यांग जलतरणपटू मुरलीकांत पेटकर यांना जीवनगौरव अर्जुन पुरस्कार देण्यात आला. तेनझिंग नोर्गो राष्ट्रीय साहसी जीवन गौरव पुरस्कार पुण्यातील ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांना प्रदान करण्यात आला. क्रीडा प्रशिक्षकांना देण्यात येणारा द्रोणाचार्य पुरस्कार नेमबाजी प्रशिक्षक दीपाली देशपांडे यांच्यासह 5 जणांना प्रदान करण्यात आला. राज्यातला नेमबाज स्वप्नील कुसाळे आणि पॅरा अथलीट सचिन खिलारी यांच्यासह 32 खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आलं.

**<u>मुख्यमंत्री</u>**

दावोसमध्ये येत्या 20 ते 24 जानेवारी या कालावधीत होणाऱ्या जागतिक आर्थिक मंच परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी होणार आहेत. महाराष्ट्रात आणखी परकीय गुंतवणूक आणण्याच्या उद्देशाने हा दौरा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या पूर्वी फडणवीस त्यांच्या पहिल्या कार्यकाळात 3 वेळा दावोसमध्ये झालेल्या आर्थिक परिषदेत सहभागी झाले होते. औद्योगिक विकासात राज्याला पाचव्या क्रमांकावरुन पहिल्या क्रमांकावर आणण्यात याचं महत्वाचं योगदान होतं. या भेटीदरम्यान अनेक जागतिक नेत्यांच्याही ते भेटी घेणार आहेत.

**<u>विखे पाटील</u>**

शेतीसाठीच्या पाण्याची तूट वाढत असल्याने शहरांनी आता पाण्याचं संवर्धन आणि शुद्धीकरण करून पाणी वापरणं आवश्यक आहे; त्यातून 40 टक्के जमीन सिंचनाखाली येऊ शकते, असं प्रतिपादन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल पुण्यात केलं. नदी जोड प्रकल्पाबाबत यशदा इथे एका कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. नदीजोड प्रकल्पाबाबत अधिक माहिती देतेना ते म्हणाले.......

**<u>इथेनॉल</u>**

इथेनॉल उत्पादनाला अधिक चालना देण्याच्या दृष्टीनं विचारमंथन करण्यासाठी काल पुण्यात एक बैठक झाली. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. सहकार क्षेत्रात काम करणारे देशभरातील अधिकारी, तज्ज्ञ आणि सहकार विभागाचे वरिष्ठ अधिकारी यात सहभागी झाले होते. मक्यापासून इथेनॉलचं उत्पादन केल्यास कारखान्यांना आर्थिक स्थैर्य मिळेल, असं केंद्रीय सहकारिता मंत्रालयाने सुचवलं होतं. त्यानुसार देशातील 63 सहकारी साखर कारखान्यांना मक्यापासून इथेनॉल बनवण्यासाठी तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. अशी माहिती हर्षवर्धन पाटील यांनी यावेळी बोलताना दिली. आसवनी प्रकल्पांच्या श्रेणीत सुधार करण्यासाठी त्यांना अर्थ साह्य मिळावं याकरता राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाने पुढाकार घेतला आणि त्याला केंद्र सरकारकडून चांगला प्रतिसादही मिळाला आहे. राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाने या कामासाठी व्याज सवलतीत मुदत कर्ज देण्याचं मान्य केलं आहे.

**<u>एसटी</u>**

एस. टी महामंडळ दरवर्षी स्वमालकीच्या 5 हजार साध्या बस खरेदी करणार आहे. त्यासाठी महामंडळा अंतर्गत पंचवार्षिक नियोजन करण्याचा निर्णय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल जाहीर केला. तसंच महामंडळात यापुढे कुठल्याही पद्धतीनं भाडेतत्त्वावर बस न घेण्याचा निर्णय घेतल्याचंही सरनाईक यांनी सांगितलं. नवीन बसेसच्या तिन्ही बाजूंना डिजिटल जाहिरातीची व्यवस्था करण्याची सूचना त्यांनी केली. महामंडळानं उत्पन्न वाढीसाठी पूरक योजना आणाव्यात, कर्मचाऱ्यांचं वेतन प्रत्येक महिन्याच्या 7 तारखेपर्यंत देण्याची काळजी घेतली जावी, त्यासाठी शासनाकडून महामंडळाला मिळणारा निधी आगाऊ स्वरूपात मिळण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचनाही परिवहन मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना बैठकीत दिल्या.

**<u>पदवी प्रदान-कोल्हापूर</u>**

शिक्षणाने प्रामाणिकपणा, करुणा आणि टीकात्मक विचारसरणीसारखे गुण जोपासले पाहिजेत, असं प्रतिपादन राज्यपाल आणि कुलपती, सी.पी. राधाकृष्णन यांनी केलं. शिवाजी विद्यापीठाच्या 61 व्या दीक्षांत सोहळ्या प्रसंगी ते काल बोलत होते. यावेळी 51 हजार 492 पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली.

**<u>पर्पल जल्लोष</u>**

पिंपरी चिंचवड महापालिका आणि दिव्यांग फाउंडेशननं आयोजित केलेल्या पर्पल जल्लोष या 3 दिवसांच्या दिव्यांग महोत्सवाचं उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते काल पिंपरी चिंचवड इथे झालं. प्रारंभ भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची प्रतिमा, दिव्यांग अधिकार कायदा आणि शिक्षण कायदा प्रत यांची पालखीमधून दिंडी काढण्यात आली.

यावेळी महापालिका आयुक्त शेखर सिंह उपस्थित होते. पवार यांनी दिव्यांगांनी भरवलेल्या प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी बोलताना पवार म्हणाले.....

**कृतीदल**

राज्य सरकारनं कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर सुरक्षा धोरण तयार करण्यासाठी कृती दलाची स्थापना केली आहे. राज्याचे माहिती तंत्रज्ञान संचालक या दोन्ही कृती दलाचे अध्यक्ष आहेत. याशिवाय खासगी क्षेत्रातल्या अनेक तज्ञांचा समावेश यामध्ये आहे. हे धोरण राज्याच्या औद्योगिक विकासाला चालना देईल, असं माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी म्हटलं आहे.

**दादाजी भुसे**

मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार शिक्षण विभागाकरीता आखण्यात आलेल्या 10 कलमी कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी; विभागाच्या अधिकाधिक सेवा ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळात शालेय शिक्षण आयुक्तालयाच्या अधिनस्त विषयाबाबतच्या आढावा बैठकीत त्यांनी यासंबंधी सूचना दिल्या. परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी कृती कार्यक्रम आखून राज्यात कॉपीमुक्त अभियान राबवावे असंही ते म्हणाले.

**सैफ-मुंबई**

अभिनेता सैफ अली खानवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी एका संशयिताला पकडलं आहे. दरम्यान सैफ अली खान यांच्या जिवाचा धोका टळला असून विश्रांतीचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

**अपघात**

पुणे-नाशिक महामार्गावर काल सकाळी झालेल्या भीषण अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला; तर तीनजण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये 4 महिला 4 पुरुष आणि एका लहान बाळाचा समावेश आहे. नारायणगावच्या दिशेने जात असलेल्या एका व्हॅनला पाठीमागून टेम्पोनं धडक दिल्याने ती रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या रिकाम्या बसवर आदळून हा अपघात झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून अपघातातल्या मृतांच्या वारसांना 5 लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**हवामान**

उद्या सकाळपर्यन्त राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.